## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठात एकाच वेळी सहा इमारतींचे यु.जी.सी. उपाध्यक्ष डॉ. पटवर्धन यांचे शुभहस्ते उद्‌घाटन**

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील शैक्षणिक विभागांचे प्रशासकीय केंद्र (कासु) इमारत, पदव्युत्तर भूगर्भशास्त्र विभाग इमारत, पदव्युत्तर रसायनशास्त्र विभाग इमारत, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग इमारत, वीज उपकेंद्र इमारत (सयंत्रासह) आदी विभागांच्या विस्तारित इमारती व विद्यापीठातील अधिसभागृहाच्या नूतनीकरणाचे उद्‌घाटन विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांचे शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, प्रभारी कुलसचिव डॉ. हेमंत देशमुख उपस्थित होते.

शैक्षणिक प्रशासकीय केंद्र (कासु) विभागाची विस्तारित इमारत रू. १,६८,७३,०३०/-, पदव्युत्तर भूगर्भशास्त्र विभागाची विस्तारित इमारत रू. १,१९,७९,६९०/-, पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागाची विस्तारित इमारत रू. २,१३,४१,३००/-, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाची विस्तारित इमारत रू. १,१०,१९,५९०/-, वीज उपकेंद्र विभागाची विस्तारित इमारत (सहयंत्रासह) रू. २,००,००,०००/-, विद्यापीठ अधिसभागृहाचे नूतनीकरण रू. ८०,००,०००/- आदींचे बांधकाम विद्यापीठ परिसरात करण्यात आले आहे. सदर इमारतींकरीता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून निधी प्राप्त झाला असून काही निधी विद्यापीठाने सुद्धा विद्यार्थ्यांकरीता सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी सदर इमारतींच्या बांधकामासाठी दिला आहे.

यु.जी.सी. उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी विविध इमारतींचे उद्‌घाटन व पाहणी केल्यानंतर विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाने दर्जेदार पद्धतीने बांधकाम केले असून फर्निचर सुद्धा उत्तम दर्जाचे लावल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व संशोधन सुविधा उपलब्ध झाल्या असून विद्यापीठ अधिसभागृहाचे नूतनीकरण करण्यात आल्यामुळे प्रशस्त असे सभागृह तयार झाले आहे. यावेळी शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय केंद्रासमोर डॉ. भूषण पटवर्धन यांनी वृक्षारोपण केले.

उद्‌घाटन समारंभाप्रसंगी भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार, भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.एफ.आर. खाद्री, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार, शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत, संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. विलास ठाकरे, विधी विभागप्रमुख डॉ.व्ही.एस. चौबे, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, विद्युत उपअभियंता श्री राजेश एडले, उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर आदी विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०२/०३/२०१९.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:Users/PRO/Desktop/University News 2019 94